पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई येथे "पु. ल. कला महोत्सव" आयोजन खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : पुलदे-२०२५/प्र.क्र.१४७ (ई-१४०८३८४)/सां.का.२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक : २८ जुलै, २०२६.

**<u>वाचा:</u>** संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांचे पत्र क्र- पुलदे/आस्था /२०२६/ पु.ल. कला महोत्सव/जा.क्र.७१९ दि.१०.०६.२०२६ रोजीचे पत्र

**<u>प्रस्तावना:-</u>**

पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई मार्फत उदयोन्मुख कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्या क्षेत्रातील जाणत्या कलावंतांच्या कलाविष्कारासाठी व्यासपीठ उपलबध करून देण्यासाठी विविध कलाविष्कारांवर आधारित "पु. ल. कला महोत्सवा" चे आयोजन दरवर्षी करण्यात येते. पु. ल. कला महोत्सव आयोजनाचा खर्च, विविध कलाविष्कारांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमासाठी प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये केली आहे. त्यानुसार सदरहू प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय:-</u>**

पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी,मुंबई यांच्यामार्फत दिनांक ०६ नोव्हेंबर,२०२६ ते १० नोव्हेंबर,२०२६ या कालावधीत "पु. ल. कला महोत्सवा" चे आयोजन करण्याबाबत अकादमीने संदर्भाधीन च्या पत्रान्वये प्रस्तावित केले आहे. त्यानुसार ०६ नोव्हेंबर,२०२६ ते १० नोव्हेंबर,२०२६ या कालावधीत "पु. ल. कला महोत्सवा" चे पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई येथे आयोजन करण्यास व सदर महोत्सवांर्गत होणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी खालील तक्त्यात दर्शविण्यात आल्यानुसार रुपये ४२,५०,०००/- (रूपये बेचाळीस लक्ष पन्नास हजार फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे-

| **अ.क्र.** | **बाबनिहाय तपशील** | **रक्कम रुपये** ( अंदाजित व सर्व करांसहीत) |
|---|---|---|
| १. | विविध कलाविष्कारांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम (प्रमुख कलावंत व इतर सहाय्यक यांचे मानधन) (०५ दिवस) | रु.२५,००,०००/- |
| २. | प्रकाश व्यवस्था | रु.१,५०,०००/- |
| ३. | ध्वनी व्यवस्था | रु.१,००,०००/- |
| ४. | रंगमंच / नेपथ्य व्यवस्था व बाह्य सजावट | रु.२,००,०००/- |
| ५. | जाहिरात (वृत्तपत्र, सोशल मिडिया) | रु.४,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ६. | डॉक्युमेंटेशन-छायाचित्रण (Photography), चित्रिकरण (Shooting), थेट प्रक्षेपण इ. | रु.४,००,०००/- |
| ७ | छपाई व डिझाईन वर्क (बॅनर्स, बॅकड्रॉप, कमान, साईन बोर्ड, निमंत्रण पत्रिका इ.) | रु.१,००,००० |
| ८ | किरकोळ व इतर खर्च (समन्वयक, समन्वय सहाय्यक इत्यादीचे मानधन व प्रवास खर्च, अल्पोपहार इ.) | रु.४,००,००० |
| | **एकूण (अक्षरी रुपये बेचाळीस लक्ष पन्नास हजार फक्त)** | **रु.४२,५०,०००/-** |

२. यासाठी होणारा खर्च मागणी क्रमांक “झेडडी-०२, २२०५ कला व संस्कृती (१०१) ललित कला शिक्षण (०७) कला अकादमी (०७) (०१) पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी (२२०५ १४६३)” ५० इतर खर्च (अनिवार्य)” या लेखाशिर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांना यासाठी नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून, त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास यासंबंधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. सदर काययक्रमासाठी होणाऱ्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांनी शासनास सादर करावे.

५. सदर शासन निर्णय वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग दोन, दिनांक १७ एप्रिल २०१५ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला, उप विभाग तीन, अ.क्र. नियम २७ (२) (अ) नुसरा प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकाराच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०७२८१२४६०५३६४३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GITA N YADAV

Digitally signed by GITA N YADAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Tourism and Cultural Affairs,
2.5.4.20=84EC8C867E177247130C5B2CE9EBE952BC911B16D489B87589C254E58ADC24EC, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=86C33C507529F3B895BCCC45E562FC0EBC4D9E29CBB4691C6759762E25DEC5EA, cn=GITA N YADAV
Date: 2026.07.28 12:46:57 +05'30'

**(गिता यादव)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

१. मा.मंत्री (सां.का.वि) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
२. महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१,मुंबई
३. महालेखाकार (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१,मुंबई
४. सचिव (सां.का.वि.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७. उप सचिव (व्यय-१५) वित्त विभाग मंत्रालय, मुंबई
८. अवर सचिव (अर्थसं.) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
९. संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई
१०. निवड नस्ती, सां.का.२